अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : ससेनि-३६१७/प्र.क्र.८६/१७/तांशि-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ : १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(२)(१४६)/१६१४६/सात-अ, दि.०३/१०/२०१६.
२) या विभागाचा शासन निर्णय क्र.ससेनि-३२१६/प्र.क्र.१९५/१६/तांशि-७, दि.१३/०१/२०१७.
३) या विभागाचा शासन निर्णय क्र.ससेनि-३२१६/प्र.क्र.१९५/१६/तांशि-७, दि.२५/०५/२०१७.
४) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१५ जून, २०१७.
५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(२)(१४६)/१६१४६/सात-अ, दि.१३/०७/२०१७ व दि.२८/०८/२०१७.
६) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे पत्र क्र. ४अ/आस्था/२०१७/६३३, दि.०४ ऑगस्ट, २०१७.
७) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.२०४४(१२)/६९७५/सात-अ, दि.०२/११/२०१७.

प्रस्तावना :

संदर्भाधिन क्र. ०१ येथील पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदासाठी ५८ उमेदवारांची शिफारस केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोग शिफारसकृत ५८ उमेदवारांपैकी ०३ उमेदवारांनी सदर पदावर रुजु होण्यास स्वारस्य नसल्याचे कळविल्यामुळे त्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले नव्हते. तसेच संदर्भाधिन क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये ५४ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. परंतु त्यापैकी काही उमेदवारांनी सदर पदावर रुजु होण्यास स्वारस्य नसल्याचे कळविल्यामुळे संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये ०३ उमेदवारांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात आले आहे. सबब, एकूण ०६ उमेदवारांची गुणवत्तेनुसार व प्रवर्गनिहाय प्रतिक्षायादीतून शिफारस करण्याबाबत आयोगास कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने संदर्भाधिन क्र.०५ येथील पत्रांन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एकूण ०६ उमेदवारांची प्रतिक्षायादीतून शिफारस केली आहे. सदर उमदेवारांना नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधिन क्र.०५ येथील पत्रांव्दारे एकूण ०६ उमेदवारांची अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीतून शिफारस केली आहे. त्या उमेदवारांची त्यांच्या नावासमोर रकाना क्र.०६ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी ते ज्या दिनांकास त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे. सदर पदस्थापना संदर्भाधिन क्र. ०४ येथील अधिसूचनेनुसार करण्यात आली आहे.

अ.क्र.	आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नांव	वर्गवारी	आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग	शासन अधिसुचना दि. १५/६/२०१७ नुसार वाटप केलेला महसूली विभाग	नियुक्तीचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७
१	श्रीमती शिवाळ अभिलाषा शामसुंदर	खुला	अपंग (Locomotor disability & celebral palsy)	पुणे	शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर.	**संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र (MS-CIT) सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**
२	श्री.सरनाईक धनंजय अशोकराव	खुला	अपंग (Blindness or low vision)	पुणे	शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर.	**वैद्यकीय तपासणी अहवाल, परभणी व चंद्रपूर येथील वास्तव्याच्या कालावधीतील चारित्र्य पडताळणी अहवाल आणि संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र (MS-CIT) सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**
३	श्री. साठे रविंद्र बाबाराव	खुला	अपंग (Blindness or low vision)	नागपूर	शासकीय तंत्रनिकेतन साकोली	**अहमदनगर येथील वास्तव्याच्या कालावधीतील चारित्र्य पडताळणी अहवाल व संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र (MS-CIT) सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**
४	श्रीमती डोके प्रणोती राजेंद्र	खुला	खुला (महिला)	पुणे	शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव	**पुणे येथील वास्तव्याच्या कालावधीतील चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**

अ.क्र.	आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नांव	वर्गवारी	आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग	शासन अधिसुचना दि. १५/६/२०१७ नुसार वाटप केलेला महसूली विभाग	नियुक्तीचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७
५	श्री. साळुंखे मनिष कमलाकर	इ.मा.व.	अपंग (Locomotor disability & celebral palsy)	पुणे	शासकीय तंत्रनिकेतन, कराड	**जयपूर येथील वास्तव्याच्या कालावधीतील चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**
६	श्रीमती खोटरे दिपीका भगवान	अ.ज.	अ.ज.	कोकण-१	शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड	**वैद्यकीय तपासणी अहवाल, ठाणे येथील चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**

०२. उपरोक्तपैकी श्री. सरनाईक व श्रीमती खोटरे वगळता उर्वरित उमेदवारांना संबंधित वैद्यकीय मंडळाने वैद्यकीय दृष्टया शासकीय सेवेकरीता पात्र ठरविले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी. सदर दोन उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती), १९८१ मधील नियम ११(१) अन्वये नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून त्यांची सहा महिन्यांची सेवा पूर्ण होण्यापूर्वी, यापैकी जे आगोदर घडेल त्याप्रमाणे आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, या अटीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. सदर दोन उमेदवारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करावे, अन्यथा सहा महिन्यांच्या कालावधीनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०३. उपरोक्तपैकी श्री. सरनाईक, श्री. साठे, श्रीमती डोके, श्री. साळुंखे, श्रीमती खोटरे यांचे उपरोक्त विवरणपत्रातील स्तंभ क्र. ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल अद्याप अप्राप्त आहेत. या उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. चापअ-१००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दि.०९/०१/२००९ नुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिन्यांच्या आत चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

०४. उपरेक्त उमेदवारांपैकी श्रीमती डोके प्रणोती राजेंद्र यांचा गुणवत्ता क्रमांक श्रीमती पवार रेखा हरिश्चंद्र यांच्या नंतर व श्रीमती पवार पुजा रामसिंग यांच्या आधी राहील .श्री. साळुंखे मनिष कमलाकर यांचा गुणवत्ता क्रमांक श्रीमती पाटील सुप्रिया सुरेश यांच्या नंतर व श्रीमती खांदे प्रितम यांच्या आधी राहील .श्रीमती खोटरे दिपीका भगवान यांचा गुणवत्ता क्रमांक श्री.सर्याम शशिकांत मोहनदास यांच्या नंतर राहील. श्रीमती शिवाळ अभिलाषा शामसुंदर यांच्या गुणवत्ता क्रमांक श्री.सलामे यशवंत आनंदराव यांच्या नंतर व श्री.लतिककुमार कोठवार यांच्या आधी राहील. श्री.सरनाईक धनंजय अशोकराव यांचा गुणवत्त क्रमांक श्री.वरके पंकजकुमार यांच्या नंतर व श्री. साठे रविंद्र बाबाराव

यांच्या आधी राहील. श्री. साठे रविंद्र बाबाराव यांचा गुणवत्ता क्रमांक श्री.सरनाईक धनंजय अशोकराव यांच्या नंतर व श्री.हैनाळकर तिपण्णा नारायण यांच्या आधी राहील.

०५. उक्त नमूद उमेदवारांची अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे :-

१) सदर उमदेवाराची वेतनश्रेणी-१५६००-३९१०० या पे बॅण्ड व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एसपीसी-२०१०/(३४/१०)/तांशि-२, दि.२०/०८/२०१० मध्ये नमूद एजीपी मध्ये राहील.
२) सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पुरक भत्ता अनुज्ञेय राहील.
३) सदर उमेदवारांना प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.
४) सदर उमेदवारांचे परिविक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.
५) शिफारसपात्र अपंग उमेदवाराने सादर केलेले अपंगात्वाचे प्रमाणपत्र आयुक्त, अपंग, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून/ संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात यावेत.
६) शिफारसपात्र मागासवर्गीय उमेदवारांचे जाती विषयक दावे, संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून/ संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात यावेत.
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.०७/०८/२००१ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०२ वर्षांच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही, तर उक्त कालावधी संपताच सदर पदावरील त्यांच्या सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.
८) सदर उमदेवारांची नियुक्ती सरळसेवा प्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमांच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.
९) सदर उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन), नियम -१९८१ मधील तरतुदींनुसार निश्चित करण्यात यावे.
१०) परिच्छेद ०१ मध्ये नमूद केलेल्या उमेदवाराने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ०७ येथे दर्शविलेल्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळवलेल्या गुणवत्ता क्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही. शिवाय नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत शासनास काहीही कळविले नाही, तर कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदर आदेश रद्द करण्यात येतील.
११) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.१८/०८/२००९ मधील तरतुदींनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील

नियुक्तीसाठी दि.०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि.१८/०८/२००९ च्या परित्रकात नमूद(i) ते (iv) येथील सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू ठरतील.

१२) सदर उमदेवारांचे सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

१३) उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१४) सदर उमदेवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

१५) सदर उमेदवारांपैकी जे उमेदवार शासकीय सेवेत कार्यरत असतील अशा उमेदवारांचे गोपनिय अहवाल न पाहता त्यांना नियुक्ती देण्यात येत आहे. सदर उमेदवारांचे गेल्या पाच वर्षातील किंवा त्यांच्या शासकीय सेवेच्या कालावधीपैकी जे कमी असेले तेवढी कालावधीच्या गोपनिय अहवाल तपासण्याची जबाबदारी त्यांना नियुक्ती देण्यात आलेल्या संस्था प्रमुखांवर सोपविण्यात येत आहे.

०६. प्रस्तुत पदाकरीता करण्यात आलेल्या नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ३१५१/२०१४ श्री. संजीत शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

०७. प्रस्तुत पदाकरीता नियुक्ती देण्यात आलेले काही उमेदवार विविध संस्थांमधून पदवी व पदव्युत्तर पदवी गुणदान १० पॉईंट स्केल वर CGPA पध्दतीने उत्तीर्ण झालेले आहेत. सदर पध्दतीमध्ये श्रेणी नमुद केलेली नाही. त्यामुळे अशी अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची श्रेणी सेवाप्रवेश नियमातील तरतुदींनुसार आहे ही बाब तपासून नंतरच त्यांना संबंधित संस्थाप्रमुखांनी रुजु करुन घ्यावे.

०८. सदर नियुक्ती उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्र नियुक्तीनंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०९. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थाप्रमुखांकडे सादर करावा. संस्था प्रमुखांनी त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७११२२१२२५३१७१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2017.11.22 12:30:15 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित उमेदवार (ई-मेलव्दारे).

प्रत:

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.

२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे).
३. मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री उच्च व तंत्रशिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर. (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).
७. प्राचार्य, संबंधित संस्था. (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).
(वरील उमेदवारांना रुजु करुन घेताना त्यांच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करुन संस्था प्रमुखांनी स्वत: खात्री करावी व सदर उमेदवारांना हजर करुन घ्यावे आणि त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. तसेच संबंधित संस्थाप्रमुखांनी या आदेशातील ज्या उमेदवारांची नियुक्ती अटींच्या अधीन राहून केली आहे त्या उमेदवारांकडून विहीत मुदतीत या अटींची पूर्तता करुन घेवून त्याबाबतचा कार्यपूर्तता अहवाल संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.)
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर/सांगली /सातारा/पालघर /भंडारा. (तंत्रशिक्षण संचालनालया मार्फत).
१०. निवड नस्ती (तांशि-७).